महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

एक्सप्रेस टॉवर्स, ४ था मजला, नरिमन पॉईंट, मुंबई -२१

जा.क्र.मजीप्रा/सस/तांशा-१/३५०/८४२ २ ऑगस्ट, २०१४

// परिपत्रक क्र.१५७//

विषय : नगरपालिकेच्या विकास कामांना तांत्रिक मंजुरी प्रदान करण्याबाबत. तांत्रिक मान्यतेचे शुल्क १% लागु केल्याबाबत.

संदर्भ :
१. राज्य शासनाच्या नगर विकास विभागाचा दि.३०.११.१९८९ चा शासन निर्णय क्र.जीईएन-१०८७/२५७३/सीआर.६२/८९/नवि-१४.
२. मजीप्राचे दि.२०.१०.१९८९ चे आंग्ल पत्र क्र. MS/MWSSB/TS-II/1050
३. नगर विकास विभागाचे दि. ६ जानेवारी, २००९ चे पत्र क्र.एशविओ-१००८/३२१२/प्र.क्र.३२४/०८/नवि-९
४. या कार्यालयाचे दि.१४.९.११ चे पत्र क्र.मजीप्रा/सस/तांशा-१/ ३५०/१३०१
५. या कार्यालयाचे दि.२६.८.१३ चे पत्र क्र.मजीप्रा/सस/तांशा-१/३५०/१२४०
६. दि.२०.५.१४ रोजी संपन्न झालेली मा.संचालक मंडळाची १३० वी बैठक

नगरपालिकेच्या विकास कामांसाठी (उदा. शाळा, पूल, रस्ते, समाज मंदिर, दवाखाना इ.), "अ" व "ब" वर्ग नगरपालिकांना रु.२०,०००/- पेक्षा जास्त व "क" वर्ग नगरपालिकांना रु.१०,०००/- पेक्षा जास्त किंमत असलेल्या अंदाजपत्रकांना, महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ च्या कलम-७२ अन्वये तांत्रिक मंजुरी शासकीय विभागाकडून घ्यावी लागते.

त्यानुसार अ व ब वर्ग नगरपरिषदांच्या विकास कामांना मजीप्राने तांत्रिक मंजुरी देण्यापोटी ०.८५% इतके शुल्क आकारण्याबाबतचा धोरणात्मक निर्णय घेण्यात येऊन, त्यानुसार कार्यवाही करण्याबाबत संदर्भ क्र. ४ च्या दि. १४.९.२०११ च्या पत्राद्वारे कळविले आहे.

तद्नंतर शासनाच्या नगर विकास विभागाच्या संदर्भ क्र. ३ च्या दि.६ जानेवारी, २००९ च्या पत्राद्वारे, मंजुर विकास योजनांव्यतिरिक्त शासनाच्या विविध योजनांमधुन हाती घेतलेल्या विकास कामांना सार्वजनिक बांधकाम विभाग किंवा मजीप्रा किंवा नगर रचना संचालनालय यापैकी कोणत्याही विभागाकडुन तांत्रिक मंजुरी घेण्यास हरकत नसल्याचे सर्व नगर परिषदांना कळविले आहे. त्यानुसार 'क' वर्ग नगरपरिषदांच्या अशा विकास कामांचे प्रस्ताव मजीप्राकडे तांत्रिक मान्यतेसाठी प्राप्त झाल्यास, त्यांना मजीप्राने तांत्रिक मंजुरी प्रदान करावी, असे स्वतंत्र निर्देश प्रस्ताव संदर्भ क्र.५ च्या दि. २६ ऑगस्ट, २०१३ च्या पत्राद्वारे क्षेत्रीय कार्यालयांना देण्यात आले आहेत. साहजिकच, या नगरपरिषदांसाठी सुध्दा ०.८५% इतके शुल्क लागु आहेत.

तथापि, आता सदर ०.८५% आकारण्यात येत असलेल्या शुल्कामध्ये ०.१५% इतकी वाढ करुन १% करण्याबाबतचा प्रस्ताव दि.२० मे,२०१४ रोजी संपन्न झालेल्या मजीप्राच्या मा.संचालक मंडळाच्या १३० व्या बैठकीत कार्यक्रम बाब क्र.१५ अन्वये मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास मा.संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली आहे.

(५)

सबब, मा.संचालक मंडळाने मान्यता प्रदान केल्यानुसार, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकास कामाच्या अंदाजपत्रके व आराखड्यांना, अंदाजित किंमतीच्या १% इतके शुल्क आकारुन तांत्रिक मंजुरी प्रदान करण्याची कार्यवाही करण्यात यावी. सदरचे शुल्क सदर परिपत्रकाच्या दिनांकापासुन लागु राहील, याची नोंद घ्यावी.

( डॉ.हेमंत लांडगे )
सदस्य सचिव

प्रत : प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, ७ वा मजला, जी.टी. हॉस्पीटल इमारत, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई.०१ यांना माहितीसाठी सादर.

प्रत : प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.३२ यांना माहितीसाठी सादर.

प्रत : मुख्य अभियंता, ना. व ग्रा./अ.तं.स/जलव्यवस्थापन/प्र.व्य.स.से./मध्यवर्ती नियोजन, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी.

प्रत : संचालक (वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन नवी मुंबई यांना माहितीसाठी.

प्रत : अधीक्षक अभियंता, (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी.

प्रत : कार्यकारी अभियंता, (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी.

प्रत : मुख्याधिकारी, नगर परिषद, (सर्व) यांना माहितीसाठी.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई-२१
रवाना
02 AUG 2014
सही